**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार, दिनांक ०५ ऑगस्ट २०२४**

**ठळक बातम्या**

1. **ग्रामीण भागात पतपुरवठ्यामधे वाढ झाली असल्याचं केंद्रीयअर्थराज्यमंत्र्यांचं लोकसभेत निवेदन.**
2. **प्रत्येक झोपडपट्टीधारकाला पट्टे देण्याचा सरकारचा मानस असल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं नागपुरात प्रतिपादन.**
3. **राष्ट्रवादी काँग्रेसची 'जनसन्मान' यात्रा राज्यात ८ ऑगस्टपासून सुरू होणार.**

**आणि**

4. **नागपूर विद्यापीठ आणि अर्जुनी मोरगावच्या एस.एस.जयस्वाल महाविद्यालयाच्या संयुक्त प्रयत्नातून डेंग्यू आणि चिकनगुनिया नियंत्रणाबाबत ऍझोला वनस्पतीद्वारे संशोधन.**

****

ग्रामीण पतपुरवठा

ग्रामीण भागात पतपुरवठ्यामधे वाढ झाली असून २०१४ मधे ७ लाख ३० हजार कोटी पतपुरवठा झाला होता त्या तुलनेत २०२४ मधे २५ लाख ४६ हजार कोटी रुपये पतपुरवठा झाला अशी माहिती केंद्रीय अर्थ राज्य मंत्री पंकज चौधरी यांनी आज लोकसभेत दिली. कृषी उत्पादन वाढण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी केंद्र सरकारन विविध उपक्रम हाती घेतले आहेत असं ते म्हणाले. मुद्रा योजना आणि स्टार्टअप इंडिया अशा योजनांमधून सरकारन युवावर्गाच्या कल्याणाच्याही योजना राबवल्या असल्याचं त्यांनी सभागृहाला सांगितलं. दरम्यान, सहारा इंडिया रिअल इस्टेट कंपनी आणि सहारा हाउसिंग इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशनमध्ये गुंतवणूक केलेल्या १७ हजार २५० गुंतवणूकदारांना आतापर्यंत 138 कोटी रुपये परत करण्यात आले आहेत, अशी माहिती केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी दिली आहे. लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात पूरक प्रश्नांना उत्तर देताना त्या बोलत होत्या. सेबी आणि सर्वोच्च न्यायालयान नेमून दिलेल्या समित्यांच्या नियमानुसार हे पैसे परत करण्यात आलेत, असंही त्या यावेळी म्हणाल्या.

राज्यसभा

राज्यसभेत आज शून्यकाळात अनेक खासदारांनी सार्वजनिक महत्त्वाचे विविध मुद्दे उपस्थित केले. भाजपचे समिक भट्टाचार्य यांनी बांगलादेशातून पश्चिम बंगालमध्ये

येणाऱ्या स्थलांतरित मजुरांच्या प्रश्नावर सरकारने गांभीर्याने विचार केला पाहिजे, अशी मागणी केली. पश्चिम बंगालच्या सीमावर्ती भागातील लोकसंख्या शास्त्रीय रचना पूर्णपणे बदलली असून, यामुळे लोकशाही, अखंडता आणि अंतर्गत सुरक्षा धोक्यात असल्याची चिंता त्यांनी व्यक्त केली. आम आदमी पक्षाचे खासदार संजयसिंह यांनी देशात कर्करोगाच्या वाढत्या संख्येचा मुद्दा उपस्थित केला.

माझी लाडकी बहीण

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेला दिलेल आव्हान उच्च न्यायालयाने फेटाळले आहे. राज्यातील माता भगिनींना सक्षम करण्यासाठी "मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना" कार्यान्वित करण्यात आली आहे.केवळ विरोध म्हणून या योजनेला देण्यात आलेले आव्हान उच्च न्यायालयाने फेटाळल्याने या योजनेची विश्वासार्हता अधिकच वाढली आहे. असं मत महिला आणि बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी आपल्या एक्स खात्यावरून व्यक्त केलं आहे.

झोपडपट्टी मालकी पट्टे-फडणवीस

प्रत्येक झोपडपट्टीधारकाला पट्टे देण्याचा सरकारचा मानस असल्याचं प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नागपुरात केलं. आज नागपुरात आयोजित मालकी हक्क पट्टे वाटप कार्यक्रमा नंतर ते माध्यम प्रतिनिधींशी बोलत होते. टीडीआर देऊन जमिनी अधिग्रहित करायच्या आणि त्या जमिनीवर जे लोक वसलेले आहे त्याना मालकी हक्काचा पपट्टा द्यायचा अशा प्रकारचा निर्णय सरकार ने घेतला असून त्याच अंतर्गत आज नागपुरात पट्टे वाटप केले आहे अशी माहिती त्यांनी दिली. आपण मुख्यमंत्री असताना निर्णय घेऊन झोपडपट्टीमध्ये जे लोक वर्षानुवर्ष राहत आहे, त्यांना राहत्या जमिनीवरच मालकी हक्काचा पट्टा देण्याचा निर्णय घेतला होता. नंतर काही अडथळे आले, ते दूर करण्याचा प्रयत्न आपण केला असं सांगून फडणवीस यांनी पुढेही हजारो गरिबांना जमिनीचा हक्क आम्ही देणार आहोत असं स्पष्ट केलं. दरम्यान, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी महाराष्ट्राला आरक्षणाची गरज नाही असे वक्तव्य केले होते .त्यावर प्रतिक्रिया देताना राज्याचे उपमुख्यमंत्री आणि भाजपचे जेष्ठ नेते देवेंद्र फडणवीस यांनी आज नागपुरात सांगितलं की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल आरक्षण हे समाजातील शेवटच्या व्यक्तीला मिळण्यासाठी आमचे सरकार कटीबद्ध आहे. आज नागपूर मध्ये पट्टे वाटपाचा कार्यक्रम झाल्यानंतर ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

हास्य व्यंग निदर्शने

नागपूरात आज सिताबर्डी इथं गांधीजींच्या पुतळ्यानजीक काँग्रेस नेते विकास ठाकरे यांच्या नेतृत्वात हास्य व्यंग निदर्शने करण्यात आली. यावेळी दिव्यांगाच्या

बायसिकल, वॉकर, दृष्टि बाधितांची काठी, खेळाडूंचे फुटबॉल, चेंडू, हॉकी प्रदर्शित करण्यात आले. निदर्शनाचा उद्देश घोटाळेबाज शासकीय अधिकारी, कर्मचारी, तसेच बनावट खोटे प्रमाणपत्र बनवणारी टोळी यावर गुन्हा दाखल करून त्यांना शिक्षा देण्याची मागणी हा होता. बोगस प्रमाणपत्र देऊन खेळाडू आणि दिव्यांग कोट्यामध्ये नोकरी मिळविणाऱ्या उमेदवारांवर कारवाई करण्याची मागणी देखील करण्यात आली.

राष्ट्रवादी काँग्रेसची 'जनसन्मान' यात्रा

राष्ट्रवादी काँग्रेसची 'जनसन्मान' यात्रा दिनांक ८ ऑगस्टपासून नाशिकच्या दिंडोरी येथून सुरू होणार असून त्यामध्ये उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र, मुंबई आणि विदर्भ असा हा पहिला टप्पा ३१ ऑगस्टला संपणार असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली निघणारी ही 'जनसन्मान यात्रा' संपूर्ण महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात जाणार असून 'जनसन्मान' यात्रेच्या निमित्तान समाजातील सर्व घटकांशी अजित पवार थेट संवाद करणार आहेत. या यात्रेच्या माध्यमातून प्रत्येक विधानसभा मतदारसंघात दोन सभा किंवा कार्यक्रम घेणार आहोत. महिला, युवक, शेतकरी, आदिवासी आणि उपेक्षित घटकांशी अजितदादा संवाद साधतील अशी माहिती तटकरे यांनी यावेळी दिली.

ऍझोला ‘मॉस्किटो फर्न

पावसाळा सुरू झाल्यानंतर मोठ्या प्रमाणात डासांचा प्रकोप वाढतो. यातूनच डेंग्यू, चिकनगुनिया यासारखे जीवघेणे आजार वाढतात. ऍझोला ‘मॉस्किटो फर्न’ या दुर्मिळ वनस्पतीद्वारे डासांवर नियंत्रण ठेवणारे संशोधन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आणि अर्जुनी मोरगाव येथील एस.एस.जयस्वाल महाविद्यालयाने संयुक्तरीत्या केले आहे. यामुळे शहरी तसेच ग्रामीण भागातील डासांचा प्रकोप नियंत्रित करीत गंभीर आजाराची तीव्रता कमी करणे शक्य होणार आहे. घरांमध्ये विशिष्ट पद्धतीने ऍजोलाची लागवड केली तर डासांच्या वाढीवर काही दिवसांमध्येच प्रतिबंध करता येतो. तसेच तलाव, विहीर आणि इतर साचलेल्या पाण्यामध्ये डासांची पैदास जवळजवळ पूर्णपणे नियंत्रित करता येते. ऍझोला एक उपयुक्त वनस्पती आहे आणि त्याचे अनेक फायदे मानव जातीस होऊ शकतात, असं या संशोधनात आढळून आलं आहे.

पॅरिस ऑलिम्पिक

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये आज, बॅडमिंटनपटू लक्ष्यसेनचा पुरुष एकेरीत कांस्यपदकासाठी सामना होणार आहे. भारतीय वेळेनुसार संध्याकाळी सहा वाजता सामन्याला सुरुवात होईल. ॲथलेटिक्समध्ये पुरुषांच्या तीन हजार मीटर अडथळ्यांच्या शर्यतीत बीडचा अविनाश साबळे सहभागी होणार आहे. त्याशिवाय आज नौकानयन आणि टेबलटेनिसचेही सामने होतील. हॉकीमध्ये भारताचा उपान्त्य फेरीचा सामना उद्या होणार आहे. आज  महिलांच्या ४०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत किरन पहल सातव्या क्रमांकावर राहिली. पॅरिस ऑलिम्पिकच्या सन्मानार्थ आज टपाल विभागानं विशेष तिकिटांचा संच प्रकाशित केला. नवी दिल्लीत झालेल्या या कार्यक्रमाला केंद्रीय दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य शिंदे आणि युवा कल्याण आणि क्रीडा मंत्री डॉ.मनसुख मांडवीय उपस्थित होते. ऑलिम्पिक आणि या स्पर्धेत उतरलेल्या क्रीडापटूंना भारताचा पाठिंबा दर्शवण्याचा या टपाल तिकीट संचामागचा उद्देश असल्याचं दूरसंचार मंत्रालयानं म्हटलं आहे.

श्रावण सुरवात

श्रावण महिन्याला आजपासून सुरुवात झाली. आज श्रावणी सोमवारनिमित्त ठिकठिकाणच्या महादेव मंदिरांमध्ये भाविक गर्दी करत आहेत. बुलडाणा शहरात भगवान भोलेनाथची नगरपरिक्रमा यात्रा काढण्यात आली. पैनगंगा नदीच उगमस्थान असलेल्या बुद्धनेश्वर इथल्या महादेव मंदिरातून अनेक भाविक भोलेनाथाच्या नगरपरिक्रमा यात्रेत सहभागी झाले होते.वाशीम जिल्हयात देखील आज विविध शिव मंदीरात जलाभिषेक आणि कावड यात्रा काढण्यात आली.

हवामान

विदर्भात नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, वर्धा, यवतमाळ आणि अमरावती या जिल्हयांमध्ये आज विजांच्या कडकडाटासह वादळ येण्याची शक्यता हवामान खात्यान वर्तवली आहे.  दरम्यान उद्या आणि परवा संपूर्ण विदर्भात वादळी पर्जन्यमानाचा  येलो अलर्ट हवामान विभागान जारी केला असून नागरिकांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

पिके पाण्याखाली

अकोला जिल्हयात  चोहोट्टा बाजार कुटासा महसूल मंडळात गेल्या आठवड्यापासून संततधार पाऊस सुरू आहे. या पावसामुळे शेतकऱ्यांचा खरीप हंगाम वाहून जाण्याच्या मार्गावर आहे. त्यामुळे या महसूल  मंडळात ओला दुष्काळ जाहीर करावा

आणि आर्थिक मोबदला हेक्टरी ५० हजार रुपये देण्यात यावा, अशी मागणी युवा रयत शेतकरी संघटनेकडून केली जात आहे.

संप

यवतमाळच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील निवासी डॉक्टरांनी संप पुकारला आहे. मार्ड या संघटनेच्या नेतृत्वात सर्व निवासी डॉक्टरांनी रुग्णालय परिसरात ठिय्या मांडून निदर्शन सुरू केली आहेत. रुग्णालयात काम करीत असताना तथाकथित सामाजिक कार्यकर्त्यांकडून वारंवार धमक्या मिळत आहेत, रुग्णांसोबत संवादाचे व्हिडिओ व्हायरल करून दबाव निर्माण केल्या जात आहे. या सर्व बाबींकडे रुग्णालय प्रशासन तक्रारी नंतरही दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप निवासी डॉक्टरांनी केला आहे. रुग्णालयात सुरक्षारक्षकांची संख्या वाढवावी, एका रुग्णासोबत एकच नातेवाईक असावा, डॉक्टरांना धमकाविणाऱ्यांवर पोलीस तक्रार दाखल करावी अशा मागण्या डॉक्टरांनी केल्या आहे. दरम्यान या संपाचा फटका रुग्णसेवेला बसला आहे.

******